NAAC Accredited 2015 'B' Grade (CGPA 2.62)

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर

Punyashlok Ahilyadevi Holkar Solapur University, Solapur

केंगाव सोलापूर - ४१३ २५५ महाराष्ट्र (भारत)

दुरध्वनी क्र. ०२१७-२७४४७७१ / ७२/ ७३ (११ लाईन्स), फॅक्स : ०२१७-२३५१३००,

संकेतस्थळ : http://su.digitaluniversity.ac.in ई-मेल: estsection@sus.ac.in, registrar@sus.ac.in, registrar@sus.ac.in



आस्थापना विभाग

**जा.क्र. :** पुअहोसोविसो/आस्था/२०२१/ 6594 दि: 4 SEP 2021

**वाचा :** (इंद्रा मालो) सचिव (प्र.सु.र.व का.), महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्रमांक: संकीर्ण २०२१/प्र.क्र.५६/१८(र.व का.) मंत्रालय(विस्तार), मुंबई दि.२३ जुलै, २०२१ रोजीचे.

## परिपत्रक

महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्रमांक: संकीर्ण २०२१/प्र.क्र.५६/१८(र.व का.) मंत्रालय(विस्तार), मुंबई दि.२३ जुलै, २०२१ च्या परिपत्रकान्वये कार्यालयामध्ये अधिकारी / कर्मचारी यांच्या भ्रमणध्वनी वापराबाबतच्या शिष्टाचाराबाबत विविध खालील सूचना देण्यात येवून शासन परिपत्रक निर्गमित करण्यात आलेले आहे.

१. कार्यालयीन कामासाठी दूरध्वनीचा वापर करताना प्राथम्याने कार्यालयातील दूरध्वनीचा (Landline) वापर करावा.
२. कार्यालयीन वेळेत कार्यालयीन कामासाठी आवश्यक असेल तेव्हाच भ्रमणध्वनीचा वापर करावा.
३. भ्रमणध्वनीवर बोलताना सौजन्यपूर्ण भाषेचा वापर करावा, बोलताना इतरांच्या उपस्थितीची जाणीव ठेवावी.
४. भ्रमणध्वनीवर बोलताना सौम्य आवाजात बोलावे, बोलताना वाद घालू नये तसेच असंसदीय भाषेचा वापर करु नये.
५. कार्यालयीन कामासाठी भ्रमणध्वनीचा वापर करताना लघुसंदेशाचा (Text Message) शक्यतो वापर करावा. तसेच मोबाईल फोनवर बोलताना कमीत कमी वेळेत संवाद साधावा.
६. भ्रमणध्वनी व्यस्त असताना प्राप्त लोकप्रतिनिधी / वरिष्ठ अधिका-यांच्या कार्यालयीन कॉल्सना तात्काळ उत्तर द्यावे.
७. भ्रमणध्वनीवर कार्यालयीन कामकाजासाठी समाज माध्यमांचा वापर करताना वेळेचे व भाषेचे तारतम्य बाळगावे.
८. अत्यावश्यक वैयक्तिक दूरध्वनी, कक्षाचे बाहेर जाऊन घ्यावेत.
९. वरिष्ठ अधिका-यांच्या कक्षात / बैठकीदरम्यान असताना आपला भ्रमणध्वनी silent / vibrate mode वर ठेवावा.
१०. वरिष्ठ अधिका-यांच्या कक्षात / बैठकी दरम्यान भ्रमणध्वनी तपासणे, संदेश तपासणे, ear piece / ear phone वापरणे अशा बाबी टाळाव्यात.
११. कार्यालयीन कामकाजासाठी दौ-यावर असताना भ्रमणध्वनी बंद ठेवण्यात येऊ नये.

सबब, प्रस्तुत विद्यापीठातील सर्व प्रशासकीय अधिकारी व कर्मचारी याना कळविण्यांत येते की, तरी कार्यालयीन कामकाज करताना भ्रमणध्वनीच्या वापराबाबत पाळावयाच्या शिष्टाचाराबाबत नमूद केलेल्या सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे.

**(प्रा. डॉ. वि. भा. घुटे)**
प्र.कुलसचिव

जा.क्र. : पुअहोसोविसो/आस्था/२०२१/
दि:
प्रति,

१. मा.कुलगुरु महोदय यांचे कार्यालय
२. मा.प्र-कुलगुरु महोदय यांचे कार्यालय
३. कुलसचिव यांचे कार्यालय
४. संचालक/विभाग प्रमुख, सर्व शैक्षणिक संकुले,
५. विभागप्रमुख, सर्व प्रशासकीय विभाग, प्रस्तुत विद्यापीठ

सदरील परिपत्रक आपल्या विभागातील सर्व प्रशासकीय अधिकारी व कर्मचा-यांच्या निदर्शनास आणून द्यावे.